# विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई

## प्रशंसनिय अहवाल

## सन—२०२५

विक्रोळी पोलीस ठाणे गु.र.क्र १८१/२०२५ कलम — ७४ भारतीय न्याय संहिता या गुन्हयातील आरोपीस अतिशय मेहनतीने पकडुन नमुद गुन्हयात अटक केली.

विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई,
दिनांकः— / /२५

# '' प्रशंसनिय अहवाल ''

मा. महोदय,

विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई यातील फिर्यादी हे दिनांक १३/०४/२०२५ रोजी सकाळी ०५.१४ वाजेच्या सुमारास मुंबई ठाणे पुर्व द्रुंतगती महामार्ग दक्षीण वाहीनी, जुने विक्रोळी पोलीस ठाणे जवळ, विक्रोळी पुर्व मुंबई या ठिकाणावरून कामानिमीत्त पायी चालत जात असताना पाठीमागुन येणा—या एका मोटार सायकल स्वाराने फिर्यादी यांच्यावय विनयभंग करण्याच्या दृष्टीने हमला केला म्हणुन विक्रोळी पोलीस ठाणे गु.र.क्र १८१/२०२५ कलम ७४ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपींना पोनि अनिल जायकर, सहा पोलीस निरीक्षक गिरीश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक पंकज पाटील, पो.ह.क्र ०७१२७८/सोनजे, पो.ह.क्र ०७१३२६/आव्हाड, पो.शि. क्र ०९०९९२/कोळेकर, पो.शि.क्र ०९२०६३/शिरसाठ, पो.शि.क्र ०९३५२६/मोटे, पो.शि.क्र ११०३६६/गाडेकर, पो.शि.क्र १११६००/दंडगव्हाळ, पो.शि.क्र १११७८८/रणखांबे, पो.शि.क्र १३०५१६/उंडरे, पो.शि.क्र १३०७८७/सावकारे, महिला पोलीस शिपाई क्र ०९१२१४/हाडवले, यांनी सदर गुन्हा महिले विरूध्द्चा गंभीर स्वरूपाचा असल्याने व सदरचा गुन्हा रात्रीच्या वेळी महिला एकटी चालत असताना घडल्याने तात्काळ मा. अप्पर पोलीस आयुक्त डॉ महेश पाटील सो़, पुर्व प्रादेशिक विभाग चेंबुर मुंबई. मा. पोलीस उप आयुक्त, विजयकांत सागर सो़, परिमंडळ —७, मलुंड मुंबई, मा. सहा पोलीस आयुक्त प्राची कर्ण सो़, विक्रोळी विभाग, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुर्यकांत नाईकवाडी सो़, विक्रोळी पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुन्हे अनिल जायकर, व गुन्हे प्रकटीकरण अधिकारी यांचे वेगवेगळी पथके बनवुन सदर गुन्हयाचा तपास चालू करण्यात आला होता.

त्यांनतर गुन्हे प्रकटीकरण पथकाने फिर्यादीकडे घडलेल्या घटनेबाबत चौकशी केली असता त्यांना आरोपीबाबत व त्यांच्या मोटार सायकल बाबत काहीही सांगता आले नाही त्यांनतर गुन्हयाच्या घटनास्थळापासुन सिसीटीव्ही कॅमे—यांचे फुटेज पाहण्यास सुरवात केली असता आरोपी गुन्हा करून मो/सा वरून जेव्हीएलआर मार्ग पवईच्या दिशेने गेल्याचा दिसुन आला. परंतु पुढे तो कोणत्याही शासकीय व खाजगी सिसीटीव्ही कॅमे—याच्या फुटेजमध्ये दिसुन आला नाही. सदर आरोपी हा कॅमेरे चुकवुन निघुन गेला त्यांनतर सदर आरोपी घटनास्थळी कोणत्या मार्गाने आला याचा सिसीटीव्ही कॅमे—यांचे फुटेज तपासुन मागोवा घेतला असता तो मुलूंड मार्ग ठाणे येथुन आल्याचे दिसुन आले त्यानंतर पोहक्र ०७१२७८/सोनजे व पो.शि.क्र ०९२०६३/शिरसाठ यांनी ठाणे पोलीस आयुक्तालय येथे जावुन शासकीय व खाजगी सिसीटीव्ही कॅमेरे तपासले असता सदर आरोपी हा आनंदनगर मार्गे कॅटभरी सिग्नल येथुन आल्याचे दिसुन आला.

त्यांनतर आणखी पुढे असणा—या सरकारी व खाजगी सिसीटीव्ही कॅमे—यांचे फुटेज पाहिले असता तो कापुर बावडी मार्ग वाघबिळ ब्रिज, घोडबंदर रोड, येथुन आला त्यांनतर सदर ठिकाणी सिसीटीव्ही फुटेज पाहिले असता सदर आरोपी हा मो/सा वरून एका महिलेला घेवुन जात असल्याचे दिसुन आले त्यांनतर पुढे आणखी खाजगी फुटेज पाहिले असता सदर महिलेस मो/सा वरून हिरानंदानी येथील एका सोसायटीमध्ये सोडले असल्याचे दिसुन आले. सदर सोसायटीमध्ये जावुन त्या महिलेचा शोध घेवुन तिचे चौकशी केली असता तिने नमुद मो/सा ही त्यादिवशी रॅपीडो ॲपवरून बुक केली होती अशी माहिती दिली.

त्याअनुशंगाने सदर राईड आयडीची माहिति रॅपीडो कंपनीकडुन प्राप्त करून सदर मो/सा चा नंबर व मोबाईल क्रमांक प्राप्त करण्यात आला व त्यानुसार सदर आरोपीचा तांत्रिक तपास करून त्यास वाकोला येथुन गुन्हयातील आरोपी नामे व आरोपी नामे उदर सुरेश खांबे वय ३८ वर्षे धंदा—चालक, रा.ठि रूम नं ४०९, खंडवाला हौ सो, दत्तमंदीर रोड, वाकोला सांताक्रुझ पुर्व मुंबई. यास ताब्यात घेवुन त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याच्याकडे नमुद गुन्हयाच्या अनुशंगाने चौकशी केली असता त्याचा नमुद गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास मा. न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन करून अटक करण्यात आली आहे.

अश्याप्रकारे नमुद गुन्हयातील आरोपीच्या शोधकामी घटनास्थळापासुन घोडबंदर रोड, कॅटबरी जंक्शन, वाघबीळ रोड, जि ठाणे येथील सरकारी व खाजगी असे एकुण १८० सिसीटीव्ही कॅमे—याचे फुटेज पाहुन नमुद आरोपीचा शोध घेण्यात आला आहे.

**तरी बाजुस नमुद पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचेकडून भविष्यात अशाच प्रकारची चांगली कामगिरी व्हावी या करीता त्यांना उत्तेजनार्थ रोख बक्षिस व प्रशस्तीपत्र देवून गौरव करावा अशी शिफारस करीत आहे.**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई.
जावक क्र.         /२०२५,
दिनांक—